दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ७२ वा शनिवार दि.१७ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी सुरु राहणार-क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे



लातूर : – राज्य शासनाने गरजू महिला–भगिनींना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेची रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. प्रत्येक पात्र महिलेला या योजनेचा लाभ मिळणार असून ही योजना कायमस्वरूपी अशीच सुरु राहणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आज सांगितले. तसेच योजनेबाबत पसरविण्यात येणाऱ्या गैरसमाजावर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची नावनोंदणी करणारे अधिकारी, यासाठी गावपातळीवर काम करणाऱ्या उदगीर, जळकोट तालुक्यातील आशा सेविका, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, बचतगटातील महिला आदी कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा आणि मार्गदर्शन मेळाव्यानिमित्त उदगीर तालुक्यातील कौळखेड येथील शिवम फंक्शन हॉल येथे आयोजित कार्यक्रमात ना. बनसोडे बोलत होते. यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, उदगीरचे गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, जळकोटचे गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महिलांना दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच वर्षाला १८ हजार रुपयांचा लाभ देण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी अर्ज भरून घेण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका, आशा कार्यकर्ती, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्य महिलांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यामुळे उदगीर आणि जळकोट तालुक्यातील पात्र महिलांची मोठ्या प्रमाणात ऑनलाईन नोंदणी झाली आहे. त्यामुळे नाव नोंदणीसाठी काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांच्या कामाची दखल घेवून त्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

पात्र महिलांच्या खात्यावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे एकत्रित तीन हजार रुपये अनेक महिलांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. उर्वरित पात्र महिलांच्या खात्यावरही लवकरच लाभाची रक्कम जमा होणार आहे. या योजनेसाठी अर्ज केलेल्या काही महिलांच्या अर्जात त्रुटी असल्याने ते अर्ज दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात आले आहेत. तसेच काही महिलांच्या बँक खात्याला आधार क्रमांक जोडले नसल्याचेही निर्दशनास आले आहे. त्यामुळे अशा महिलांनी लवकरात लवकर आपल्या अर्जातील त्रुटींची दुरुस्ती करावी. ज्या महिलांच्या बँक खात्याला आधार जोडलेले नाही, अशा महिलांनी आपल्या बँकेत जावून बँक खात्याला आधार क्रमांक जोडून घ्यावा, असे आवाहन ना. बनसोडे यांनी केले.

उदगीर येथे एमआयडीसी मंजूर करण्यात आली असून याठिकाणी मोठे उद्योग सुरु होवून युवकांसाठी रोजगार उपलब्ध होतील. तसेच तालुक्यातील आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणाचे काम गेल्या पाच वर्षात करण्यात आले आहे. रस्त्याच्या विकासामुळे दळणवळण सुविधा गतिमान झाल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

यावेळी उपस्थित असलेल्या महिलांनी ना. बनसोडे यांना राखी बांधून त्यांचे औक्षण केले. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रकम बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाल्याबद्दल आभार मानले. ना. बनसोडे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविका, आशा सेविका, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित पदाधिकारी, अधिकारी आणि महिलांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

## विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेत. सह.सा. कारखान्यात ७८ व्या स्वातंत्र्य दिना निमित्त ध्वजारोहण संपन्न



विलासनगर : विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. विलासनगर ता.जि. लातूर येथे ७८ व्या स्वातंत्र्य दिना निमित्त कारखान्याचे चेअरमन सहकार महर्षी मा.श्री.दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत कारखान्याचे व्हा. चेअरमन श्री. श्रीशैल उटगे यांच्या हस्ते कारखाना साईटवरील प्रशासकिय इमारतीसमोर सकाळी ठीक १०.०१ वाजता ध्वजारोहण करण्यांत आले. सदर प्रसंगी माजी मंत्री सहकार महर्षी मा.श्री दिलीपरावजी देशमुख यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सर्वांना समता व बंधुत्वाचा संदेश दिला. यावेळी जागृतीचे व्हा चेअरमन, श्री लक्ष्मणराव मोरे, जिल्हा बँकेचे व्हा. चेअरमन, श्री. प्रमोद जाधव, विलास कारखान्याचे व्हा. चेअरमन, रवी काळे, संचालक गुरुनाथ गवळी, गोविंद डुरे, संजय पाटील, बिडवे, रेणा कारखान्याचे व्हा. चेअरमन अनंतराव देशमुख, संचालक संभाजी रेड्डी, लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती, जगदीश बावणे, मारुती महाराज कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, व्हा. चेअरमन सचिन पाटील, इंदिरा सुत गिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम, लातूर जिल्हा बँकेचे माजी चेअरमन श्रीपतराव काकडे. माजी व्हा. चेअरमन, पृथ्वीराज शिरसाट, माजी अध्यक्ष कॉग्रेस सेवादल श्री रमेश सुर्यवंशी, सचिन दाताळ, संभाजी सुळ व विविध संस्थाचे पदाधिकारी तसेच कारखान्यांचे सर्व सन्माननीय संचालक मंडळ, कार्यकारी संचालक श्री. पंडित देसाई, खाते प्रमुख, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हजारोंच्या उपस्थितीत आमदार भीमरावजी केराम यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा

किनवट /शेख शौकत :–किनवट/माहूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस किनवट शहरासह ग्रामीण भागात प्रचंड उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला असून यानिमित्त हुतात्मा गोंडराजे मैदानात हजारोच्या उपस्थितीत आ. भीमराव केराम यांना क्रेनमशीनद्वारे ४०० किलोचा भव्य हार घालून अभिष्टचिंतन करण्यात आले. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती तसेच ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांनी सकाळपासून हार तुरे घेऊन अलोट गर्दी केली होती. किनवट मतदारसंघात कमी कालावधीत सर्वाधिक विकासकामे केल्यामुळे भीमराव केराम हे आतार्यंतचे सर्वात यशस्वी व लोकप्रिय आमदार ठरले आहेत. अशा भावना या यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.



किनवट विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस दि. १५ ऑगस्ट रोजी किनवट व माहूर तालुक्यातील गाव, वाडी व तांड्यात विविध उपक्रम राबऊन उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

सकाळी ५ वा. पेंदा येथील प्रसिद्ध नागढव मंदिरात आमदार भीमराव केराम यांनी मनोभावे विधिवत पूजा अर्चना करून दिवसाची सुरुवात केली. यावेळी नागढव देवस्थानचे मुख्य पुजारी बाळू महाराज, विधानसभा निवडणूक प्रमुख बाबुराव केंद्रे युवानेते विवेक केंद्रे व नागनाथ कराड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. त्यानंतर साई मंदिरात जाऊन त्यांनी दर्शन घेतले असून यावेळी गुरुस्वामी पवार तसेच माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी त्यांचा सत्कार करून अभिष्टचिंतन केले. अभिष्टचिंतनाचा मुख्य कार्यक्रम किनवट येथील हुतात्मा गोंडराजे मैदानात आयोजित केला होता. यावेळी हजारो नागरिकांच्या उपस्थितीत व फटाक्यांची जोरदार आतिशबाजी करत, ढोल ताशाच्या गजरात आमदार भीमराव केराम यांना ४०० किलो वजनाचा भव्यदिव्य हार मोठ्या क्रेनमशीनद्वारे घालून कार्यकर्त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. भाजपाचे युवानेते कुलदीप चिकाटे, सचिन आठवले, संभाजी सोनकांबळे व त्यांच्या मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यानंतर पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने जिल्हाध्यक्ष विनोद भरणे यांनी महात्मा फुले चौक येथे वाढदिवसानिमित्त आ. भीमराव केराम यांचा भव्य सत्कार करून शुभेच्छा दिल्या तसेच यानिमित्त भोजनदान दिले. समतानगर येथील तक्षशिला बौद्ध विहारात महिला मंडळाच्यावतीने वाढदिवस साजरा केला असून यावेळी तालुक्यातील विकासकामाबद्दल कौतुक केले वाढदिवसानिमित्त आ. भीमराव केराम यांना पेढे भरऊन शुभेच्छा दिल्या. भाजपा ओबीसी आघाडीच्या वतीने सारखणी येथे वाढदिवस आयोजित केला होता. यावेळी आ. भीमराव केराम यांचे आगमन होताच त्यांच्यावर जे.सी.बी मशीनद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली व भव्य हार घालून वाढदिवस जल्लोशात साजरा केला. तालुक्यातील सावरगाव, बोधडी घोटीफाटा, सारखणी, चिखली खुर्द, बेल्लोरी धा. पालाईगुडा,थारा, गोकुदा पंचायत समिती कार्यालय गोकुंदा येथील आदिवासी संशोधन केंद्र यासह ठिक ठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त सकाळपासून किनवट येथील लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात तसेच त्यांच्या निवासस्थानी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, कार्यकर्ते हितचिंतक चाहते व नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी हार तुरे घेऊन दिवसभर अलोट गर्दी केली होती. विशेष म्हणजे सोशल मीडियावर दिवसभर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव झाल्याचे दिसून आल्यामुळे भीमराव केराम हे कमी कालावधीत सर्वाधिक विकासकामे करणारे आतापर्यंतचे सर्वात यशस्वी व लोकप्रिय आमदार ठरले आहेत.

दरम्यान वाढदिवस असल्याचे कळतात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीशजी महाजन, राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण, माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून आमदार भीमराव केराम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

## चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते विलास सहकारी साखर कारखान्याच्या रोलरचे पूजन



लातूर /प्रतिनिधी :– तालुक्यातील वैशालीनगर निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या हंगाम २०२४–२५ च्या गळीत हंगाम रोलरचे पूजन कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते दि.१६ ऑगस्ट रोजी करण्यात आले. यावेळी रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनंत देशमुख, डॉ. सारीका देशमुख, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई, रेणा सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक भिमराव मोरे, श्री. संत शिमोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक रविशंकर बरमदे, जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर गणेश येवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

विलास सहकारी साखर कारखान्याने स्थापनेपासून आजपर्यंत सर्वच गळीत हंगाम यशस्वतीपणे पार पाडले आहेत. आगामी गळीत हंगामाची तयारी सुरु करण्यात आली आहे. शुक्रवारी कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते रोलर पुजन झाले. या कार्यक्रमास कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, संचालक बंकट भिसे, गोविंद बोराडे, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, अमर मोरे, रजीत पाटील, गोविंद डुरे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभास माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडिले, कार्यकारी संचालक संजीव देसाई यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## ॲड विनायक बाजपाई यांना बंधू शोक

### स्व विलास बाजपाई यांच्या तेराव्या दिनानिमित्त सात्वन भेट



लातूर :– महसूल कॉलनी लातूर येथील रहिवासी असलेले ॲड. विनायक बाजपाई यांचे बंधू स्व विलास विद्याभूषण बाजपाई यांचे ३ ऑगस्ट २०२४ रोजी निधन झाले होते. १५ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांचा तेरावा महसूल कॉलनी येथील स्वतःच्या घरी करण्यात आले. त्यानिमित्त बाजपाई परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखातून त्यांना सावरण्यासाठी प्रार्थना करण्यात आली. बाजपाई परिवारांचे महसूल कॉलनी येथील घरी जाऊन सात्वन करून भेट घेण्यात आली . एडवोकेट विनायक विनायक बाजपाई व त्यांच्या परिवाराचे बी एल कांबळे शासकीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल , के डी गायकवाड उपाधीक्षक भूमी अभिलेख (सेवानिवृत्त ), अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त यांनी सात्वन केले .

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# मुख्यमंत्रिपदाचा चेहरा

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी जेमतेम तीन महिन्यांचा कालावधी बाकी असतानाच आणि सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी या निवडणुकीची तयारी केली असतानाच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, हा विषय समोर येऊ लागला आहे. सध्या विरोधी बाकावर बसलेल्या महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी हा विषय जास्त चर्चेत ठेवला आहे. सत्ताधारी महायुतीमध्ये अद्याप या विषयाची चर्चा सुरू झाली नसली, तरी अंतर्गत पातळीवर काही प्रमाणात मात्र निश्चितच कुजबूज सुरू झाली आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी सत्ताधारी महायुतीचा महाराष्ट्रात जोरदार पराभव केल्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्येही अशाच प्रकारच्या जोरदार यशाची खात्री महाविकास आघाडीच्या नेत्यांना आहे. त्यातूनच हा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, हा विषय समोर आला आहे.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत सातत्याने उद्धव ठाकरे हेच महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असतील, असे सांगत आहेत. महाविकास आघाडीतील दोन प्रमुख घटक पक्ष असलेल्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्ष यांनी मात्र उद्धव ठाकरे यांचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून अद्याप मान्यता दिलेली नाही. उलट काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये ही मागणी नाकारली आहे. शरद पवार यांनीसुद्धा विधानसभा निवडणूक सामूहिक नेतृत्वाच्या पद्धतीने लढवली जाईल, असे सुतोवाच केले आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीसुद्धा ज्या पक्षाच्या जास्त जागा निवडून येतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल, असा फॉर्म्युला सुचवला आहे.

केवळ लोकसभा निवडणुकीच्या यशाचा विचार करता सर्वात जास्त यश काँग्रेस पक्षाला मिळाले आहे. अनेक ठिकाणी भाजपच्या उमेदवारांचा पराभव करून काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत. दुसरीकडे शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसनेसुद्धा अजित पवार यांच्या उमेदवारांचा पराभव केला आहे. पण उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मात्र अनेक ठिकाणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या उमेदवारांना पराभूत करता आलेले नाही याची जाणीवही अधूनमधून नाना पटोले आणि काँग्रेसचे इतर नेते करून देत असतात. साहजिकच विधानसभा निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांचा चेहरा पुढे करून मतदारांना सामोरे जाण्याबाबत अद्याप महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये कोणतेही एकमत नाही.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या २५ वर्षांच्या कालावधीमध्ये आघाडीचे राजकारण करून सत्तेत असलेल्या शरद पवार यांच्या पक्षाने नेहमीच विधानसभा निवडणुकीमध्ये जरी जास्त जागा जिंकल्या असल्या, तरी कधीच मुख्यमंत्रिपदाचा आग्रह धरला नव्हता. काँग्रेस बरोबर युती असताना त्यांनी काँग्रेसपेक्षा जास्त जागा जिंकल्या तरी महत्त्वाची खाती स्वतःकडे ठेवून त्यांनी काँग्रेसच्या नेत्यांनाच मुख्यमंत्रिपद बहाल केले होते. याच कारणामुळे अजित पवार यांनी शरद पवार यांच्याबाबत नाराजीही प्रकट केली होती. साहजिकच उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या चेहर्याला थेट पाठिंबा न देता शरद पवार यांनी सामूहिक नेतृत्वाच्या जोरावरच निवडणूक लढवली जाईल, असे संकेत दिले आहेत.

संजय राऊत यांनी मात्र काँग्रेसवर टीका करताना काँग्रेसमध्ये जर मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असेल तर त्यांनी तो जाहीर करावा, असे आव्हान दिले आहे. तसा विचार करता काँग्रेसमध्ये सध्या अनेक महत्त्वाचे नेते आहेत ज्यांनी कधी ना कधी मुख्यमंत्रिपद सांभाळले आहे. जरी अशोक चव्हाण यांच्यासारखे माजी मुख्यमंत्री भाजपामध्ये सामील झाले असले तरी पृथ्वीराज चव्हाण, सुशीलकुमार शिंदे हे माजी मुख्यमंत्री अद्यापही काँग्रेसमध्ये सक्रिय आहेत. याशिवाय नाना पटोले, बाळासाहेब थोरात या नेत्यांनी आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षा लपवून ठेवलेल्या नाहीत. जरी राजकीय रणनीतीचा भाग म्हणून काँग्रेसने आपल्या कोणत्याही नेत्याचा चेहरा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून समोर आणलेला नसला तरी त्याचवेळी त्यांना उद्धव ठाकरे यांचा चेहराही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून जाहीर करण्यास विरोध असण्याची शक्यता अधिक आहे.

मुख्यमंत्री म्हणून कोणालाही प्रोजेक्ट न करता सामूहिक नेतृत्वाच्या पद्धतीनेच विधानसभा निवडणुकीला सामोरे जावे, हाच काँग्रेस आणि शरद पवार यांचा आग्रह आहे. पण उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे नेते मात्र प्रचारांमध्ये उद्धव ठाकरे यांचेच नाव आगामी मुख्यमंत्री म्हणून प्रोजेक्ट करताना दिसतील हे उघड आहे. विरोधी बाकावरील महाविकास आघाडीची अशी परिस्थिती असताना सत्ताधारी महायुतीमध्ये अद्याप मुख्यमंत्रिपदाचा विषय समोर आला नसला, तरी देवेंद्र फडणवीस यांनी अनेक वेळा आगामी निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच लढली जाईल अशी घोषणा केली आहे. अजित पवार यांनीसुद्धा त्याला मान्यता दिली आहे.

भाजप सर्वात मोठा पक्ष असला तरी त्यांनी आपल्यापेक्षा छोटा पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे मुख्यमंत्रिपद बहाल केले आहे आणि आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये या विषयावरून वाद होण्याची शक्यता कमी आहे. जरी एकीकडे दीडशेपेक्षा जास्त जागा लढवण्याचा निर्धार भाजपाच्या नेत्यांनी केला असला आणि एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उर्वरित जागा देण्यात येणार असल्या तरीही मुख्यमंत्रिपदाचा विषय अद्याप महायुतीच्या नेत्यांनी चर्चेला घेतलेला नाही. निवडणुकीचे निकाल हाती आल्यानंतरच या विषयाचा तुकडा पाडण्याचा निर्णय महायुतीच्या सर्वच नेत्यांनी घेतला असावा. निवडणुकीपूर्वी या विषयावरून वाद नको अशीच भूमिका महायुतीच्या नेत्यांनी घेतलेली दिसते. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे नेतेसुद्धा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण हा विषय जास्त ताणणार नाहीत आणि सामूहिकपणे मतदारांना सामोरे जातील अशी अपेक्षा या निमित्ताने करावी लागणार आहे. बहुमत मिळाल्यावर मुख्यमंत्री कोण, हे ठरवणे जास्त योग्य हे सर्वांनी समजून घ्यायला हवे.

# शासकीय राजकीय जातीभेदामुळे एका धर्मांतरीत बौद्धावर अन्याय

ता. परतूरच्या शनिवार बाजार जवळ देशमुख फंक्शन् हॉल बाजूच्या गल्ली मध्ये रहिवाशी नागरिक असणा–या नगर परिषद मधील सफाई कर्मचारी नाव रमेश रतन कांबळे यांनी परतूर येथिल जिल्हा परिषद मैदानावर पहिल्या बौद्ध धम्म् परिषद मध्ये २००८ला जेव्हा पासून कुटुंबासह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली तेव्हा पासून परतूर नगर परिषदेवर वर्चस्व् ताबा असलेल्या माजी नेता सुरेश कुमार जेथलिया यांच्या जातीवादी राजकीय हस्तक्षेपातून परतूर नगर परिषद मधील संबंधित अधिकारी वरिष्ठ कर्मचा–याच्या राजकीय हस्तका मार्फत वर्ष २०२४ पर्यंत कर्मचा–याला जातीय द्वेषातून नौकरी करताना बौद्ध कर्मचारी आणि नागरीकास भेदभाव सुरू राहून शनिवार बाजार, देशमुख फंक्शन् हॉल जवळ केवळ कर्मचारी नागरिकाच्याच गल्लीला सोडून इतर बाजूच्या गल्लीत रोड रस्ता, नाली गट्टार व पाणी पाईप लाईन व इतर सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. परंतु नागरिक असणा–या कर्मचा–याच्या घरा समोरील नाली, रस्त्याचे, बांधकाम करण्यासाठी आणि सार्वजनिक इतर नागरिकांसारख्या समान सेवा सुविधा मिळण्याकरिता कर्मचा–याच्या घरा समोरील नाली व रोड रस्त्याचे बांधकाम करायला व इतर गैरसोयीची पुर्तता करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून अस्पष्ट कारण सांगून असमानतेने टाळले गेले आहे. मी अनेक वेळा तोंडी तक्रार व लेखी अर्ज दाखल केले आहेत मात्र वारंवार आश्वासन देऊन पुन्हा पुन्हा खोटे बोलून मला नौकरी सेवेत कर्मचारी व गल्लीत नागरिक असता मला कायमचा जातीभेद चालू राहिलेला आहे. यातून कर्मचारी नागरिकाला नेहमी विरोध होत आलेला आहे. हा कर्मचारी धर्मांतरीत बौद्ध असल्यामुळे शासकीय राजकीय पातळीवरून १७ वर्षांनी बौद्ध कर्मचा–यावर सतत अपमान अन्यायने हमेशा सामाजिक आर्थिक पिळवणूक केली जात आहे. बौद्ध दीक्षीत कर्मचारी झाल्याने मनुवादी खाजगी कायद्याने मनमानी कारभार केला जाऊन बौद्ध कर्मचा–याला रात्र आन दिवस साम दाम दंड भेद नीती राबवून व वापर उपयोग केल्याने आजपर्यंत कर्मचारी व (नागरीकाला) जातीभेद कायम सुरू आहे. नौकरी ठीकाणी सेवा जेष्ठता कर्मचारी असताना बढती विरुद्ध खोटी कार्यवाही करून डावललेले असल्याने गल्ली मध्ये नागरिक राहणा–या कर्मचा–याला इतर नागरीका प्रमाणे नागरी सोयी सुविधा देण्याच्या सर्व समान न्याय हक्का पासून आज पर्यंत (कर्मचारी) नागरीकाच्या परिवारास वंचित केले जात आहे. जातीवादी नेता पुढारी सुरेश कुमार जेथलिया यांच्या सांगण्या वरून माझ्या सर्व खाजगी सरकारी कार्यवाही व्यवहारात भेदभाव केला जात आहे. त्यासाठी हमेशा प्रलंबित मूलभूत मागणीसाठी पाठपुरावा करणा–यां कर्मचा–याच्या ख–या आ–वाजाला दाबण्याचे प्रयत्न केले जात आहेत. पूर्वी पासून ते आजपर्यंत सर्व गाव शहरात नागरिक व कामगार कर्मचारी संघटीत नसल्याने माजी नेत्याकडून सर्वांमध्ये फूट पाडून असमता राखून सर्वांची दिशाभूल करून मानसिक शोषण व फसवणूक केली जात आहे. माजी नेता सुरेश कुमार कन्हैयालाल जेथलिया यांच्या राजकीय सामाजिक आर्थिक जातीवादी भ्रष्टाचाराच्या दबाव कारणाने राजकारणाची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दहशत भिती पसरवून माझ्या नौकरी सेवेत कामगार कर्मचारी साथीदार सोबत व गावा मध्ये मी ज्यांना भेटलो किंवा बोललो त्याच्यावर नजर ठेवून त्या व्यक्तीचे नुकसान करतात किंवा त्या व्यक्तीला फायदा लाभ देतात. आपल्या बहुजन समाजामध्ये पण काही अपवाद वगळता भेदभावाची वागणूक मिळत आहे. मी बौद्ध दीक्षा घेतल्याने वरिष् कनिष् शासकीय कार्यालयात माझ्या सर्व साधारण किरकोळ तक्रार मागणी समस्यांची माणुसकी नाते जाणीव होऊन सहानुभूतीने शासकीय कार्यालयानी धर्मांतरीत बौद्धाची पूर्वी पा–सून व आताच्या संदर्भ मागणी समस्यांची नियमा प्रमाणे हरकत घेण्यास आज पर्यंत टाळाटाळ केलेली आहे. शासकीय राजकीय जातीभेदामुळे सर्वत्र अशी कठीण परिस्थिती व असे गंभीर खराब वातावरण निर्माण केले गेले आहे त्यामुळे आज सर्व सामान्य् जनता नागरिका समोर नियमानुसार जाहीरपणे हा खरा माहिती खुलासा उघड करण्यात येत आहे. तरी धर्मांतरीत बौद्ध कुटूंबाची संविधानिक मार्गाने समानतापूर्वक न्याय निकाल देण्यास ता. परतूर शहराच्या सर्व नागरिक मतदार राजा यांनी परतूर नगर परिषद कार्यालयात जाब विचारणा करण्यास खरी दखल घ्यावी. :

**सर्व सामान्य् भारतीय नागरिक व न.प. बहुजन कर्मचारी रमेश कांबळे रा. परतूर जि. जा–लना. महाराष्ट्र राज्य मो. ८८०५५८२४८०दि. ३१–जुलै–२०२४पर्यंत कळविल्यानुसार दि.०१/०८/२०२४ रोजी हे पत्रक प्रकारशित केले आहे.**

# उत्पादन क्षेत्रात गती हवी!



भारतात देशांतर्गत बाजारपेठ मोठी आहे. तसेच अगणित मजूर आपल्याकडे आहेत. मात्र, भारत गेल्या तीन दशकांत अनेक देशांच्या तुलनेत खूप मागे राहिला आहे.

२०४७ पर्यंत समृद्ध भारताच्या दिशेने वाटचाल करण्याचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समोर ठेवले आहे. त्यासाठी देशातील शेतीवरील भार कमी होऊन उद्योगधंदे वाढले पाहिजेत आणि शेतीतील काम करणार्यांचा भार उद्योग क्षेत्राकडे वळला पाहिजे. उद्योगगंगा ग्रामीण भागातही पोहोचली पाहिजे; परंतु या संदर्भातील ताजी आकडेवारी मात्र निराशाजनक आहे.आयआयपी म्हणजेच भारताचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक जून महिन्यात ४.२ टक्क्यांवर आला असून, जानेवारी २०२४ पासूनचा हा नीचांक म्हणता येईल, असा हा आकडा आहे. याचे कारण, वीज आणि खाणकाम क्षेत्रांनी चांगली कामगिरी करूनही निर्मिती क्षेत्राच्या गतिमंदतेने आयआयपी अतिशय खाली आला आहे. आधीच्या मे महिन्यात तो ६.२ टक्के होता. आयआयपीमध्ये मॅन्युफॅक्चरिंग म्हणजे उत्पादनाचा वाटा किंवा भारांक ७७ टक्के इतका आहे. कारखाना क्षेत्रातील उत्पादनाचा वेग संथ होणे हे निरोगी अर्थव्यवस्थेचे लक्षण मानता येणार नाही. उत्पादन क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल मशिनरी, धातू आणि वाहतूक क्षेत्र यांची प्रगती समाधानकारक आहे. परंतु सार्वत्रिक निवडणुका आणि त्यांचा प्रचार व आचारसंहिता यामुळे रस्ते, धरणे, कालवे, बंदरे यांची कामे थोडी सैल पडली होती, त्याचा उत्पादनक्षेत्रास फटका बसला. फर्निचर, कॉम्प्युटर, ऑप्टिकल उत्पादने या क्षेत्रांत उत्तम वाढ झाली. परंतु चर्मोद्योग तसेच अन्य काही क्षेत्रे मागे पडली. केंद्र सरकारने भांडवली खर्चावर प्रचंड भर दिला असून, त्याचवेळी मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादनक्षेत्राची भरभराट व्हावी, यासाठी उपाययोजनाही केल्या आहेत. म्हणूनच ऑगस्ट २०२३ मध्ये देशाचा औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक (आयआयपी) दहा टक्क्यांवर जाऊन पोहोचला होता. जुलै २०२३ मध्ये आयआयपी वाढीचा दर ५.७ टक्के होता. वीज तसेच खाणक्षेत्र यांच्यातील विकास अतिशय गतिमान पद्धतीने झाला होता. केंद्र सरकारने उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेअंतर्गत (पीएलआय) वेगवेगळ्या १४ उद्योगक्षेत्रांमध्ये सप्टेंबर २०२३ पर्यंत ९५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक नव्याने आकर्षित केली.केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानेच दिलेल्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत नोव्हेंबर २०२३ पर्यंत ७४६ प्रस्ताव मंजूर करण्यात आले. लाभार्थी कंपन्यांनी २४ राज्यांतील दीडशेहून अधिक जिल्ह्यांमध्ये आपले कारखाने उभारले. या प्रकल्पांमधून ७ लाख ८० हजार कोटी रुपयांची भरघोस उत्पादन/विक्री झाली आणि त्यामधून जवळपास साडेसहा लाख इतक्या लोकांना रोजगार मिळाला.

२०२२–२३ मध्ये या प्रकल्पांकरिता २९०० कोटी रुपये आर्थिक प्रोत्साहने म्हणून वितरितही करण्यात आले होते. गेल्या तीन वर्षांत पीएलआय योजनेमुळे मोबाइल उत्पादनात २० टक्के वाढ झाली. २०२२–२३ मध्ये १०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त मूल्याच्या इलेक्ट्रॉनिक उत्पादनांची निर्मिती होऊ शकली. त्यात ४४ अब्ज डॉलर किमतीच्या स्मार्टफोनचा समावेश होता. तर त्यापैकी ११ अब्ज डॉलर मूल्याच्या स्मार्टफोनची निर्यातही झाली. स्वप्ने साकार होतात, ती ही अशी.भारतीय उत्पादनक्षेत्रात पुरेशी ‘डेप्थ’ नाही, असे मानले जाते. तशी ती असेल, तर विदेशी स्पर्धेचा आपण मुकाबला करू शकतो. आंतरराष्ट्रीय व्यापारात दीर्घकाळ टिकणारी अशी स्पर्धात्मकता असेल, तर टप्प्याटप्प्याने मजुरांची वेतनपातळी व उत्पन्नही वाढू शकते. एक अब्जापेक्षा जास्त लोकसंख्येचे जगात भारत व चीन असे दोनच देश आहेत. त्यामुळे भारतात देशांतर्गत बाजारपेठच मोठी आहे. शिवाय जागतिक बाजारपेठांसाठी उत्पादनकार्यात स्वतः ला लोटून देणारे अगणित मजूर आपल्याकडे आहेत. मात्र भारत गेल्या तीन दशकांत अनेक आशियाई देशांच्या तुलनेत खूप मागे राहिला आहे.१९९० मध्ये भारताचे उत्पादनक्षेत्र चीनशी टक्कर देऊ शकत होते. परंतु त्यानंतरच्या काळात चीनच्या उत्पादनक्षेत्राचा आकार दहापटीने वाढला आहे, तर भांडवली माल व यंत्रोपकरण क्षेत्रामध्ये चीनने ५० पट वाढ साध्य केली आहे. केवळ रोजगारप्रधान उत्पादनच नव्हे, तर इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार, वीजसामग्री, यंत्रोपकरणे या क्षेत्रांतही चीन उच्च तंत्रज्ञानाचा उत्तम रीतीने वापर करत आहे. याला उत्पादकीय क्षमतेची ‘डेप्थ’ असे म्हटले जाते. त्यामुळे चीन पाश्चात्त्य देशांशीही स्पर्धा करू शकत आहे. जागतिकीकरणामुळे १९९०च्या दशकात जगातला व्यापार व गुंतवणूक वाढू लागली. सर्व देशांना आपापल्या व्यापारी सीमा खुल्या कराव्या लागल्या. त्यामुळे भारत आणि चीन या दोन्ही देशांतील ग्राहकांना विविध देशांतील माल व सेवांचा आनंद घेता येऊ लागला. मात्र, चीनच्या तुलनेत भारतातील देशी उत्पादनक्षेत्र खूपच मागे पडले आहे.

२०१४ नंतर मोदी सरकारने ‘मेक इन इंडिया’ या मोहिमेला सुरुवात केली. भारताला जगासाठीच्या कारखान्याच्या भूमिकेत (मॅन्युफॅक्चरिंग हब) आणणे, हा त्यामागील हेतू होता. चार वर्षांपूर्वी सरकारने सेमिकंडक्टर बनवणार्या कंपन्यांपासून ते मोबाइल इलेक्ट्रॉनिक्स तयार करणार्या कंपन्यांपर्यंत सर्वांना भरघोस मदत दिली. देशाची उत्पादनक्षमता वाढवण्याचा उद्देश त्यामागे होता. परंतु या मोहिमांना जेवढे यश मिळायला हवे, तेवढे यश अद्याप मिळालेले नाही.

# लातूर येथे भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा लातूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर- क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर :– जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. सर्वसामान्य नागरिक हा विकासाचा केंद्रबिंदू असून शेतकरी, महिला, युवा वर्गासाठी शासनाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. यामाध्यमातून सर्व समाज घटकांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रारंभी ना. बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, भारत कदम, अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सलीम शेख, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, जावेद शेख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे, जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, पत्रकार, अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.

नारी शक्तीच्या सन्मानासाठी राज्य शासनाने सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून प्रत्येक पात्र महिलेला दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच एका वर्षात १८ हजार रुपयांचा लाभ दिला जाणार आहे. जिल्ह्यातील सुमारे ३ लाख ८५ हजार महिलांनी या योजनेसाठी अर्ज केले ससून पात्र महिलांच्या बँक खात्यावर लवकरच जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३ हजार रुपये जमा केले जाणार आहेत. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून पात्र महिलांना दरवर्षी ३ गॅस सिलेंडर मोफत दिले जाणार आहेत. मुलींना मोफत व्यावसायिक उच्च शिक्षण देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे जिल्ह्यात शिक्षण घेणाऱ्या ३ हजार ७२० मुलींचे जवळपास १८ कोटी ४७ लाख रुपयांचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफ होणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

राज्यातील युवकांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षित युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल. सहा महिन्यांच्या प्रशिक्षण काळात राज्य शासन



दरमहा ६ ते १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. तसेच अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासनाकडून मदत केली जात आहे. २०२३-२४ मध्ये इयत्ता दहावीनंतरचे शिक्षण घेणाऱ्या ११ हजार ९३५ विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेतून ४३ कोटी १६ लाख रुपये शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतून ५ हजार ६६५ विद्यार्थ्यांना २२ कोटी ६५ लाख रुपये रक्कम अदा करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

मातंग समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाने अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच 'आर्टी'ची स्थापना केली आहे. राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी जळकोट आणि रेणापूर येथे संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहे सुरु केली आहेत. त्यामुळे या मुलांचे शिक्षण अखंडितपणे सुरु राहण्यास मदत होणार असल्याचे ना. बनसोडे म्हणाले.

**शेतकऱ्यांना वीज सवलत; कापूस व सोयाबीन उत्पादकांना अनुदान**

शेतकरी बांधवांच्या साडेसात अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या कृषीपंपाला मोफत वीज पुरविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना जाहीर केली आहे. जिल्ह्यात सुमारे १ लाख ४१ हजार शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होईल. जिल्ह्यात विद्युत पुरवठा सुरळीत होण्यासाठी विद्युत वितरण व्यवस्था बळकट केली जात आहे. नादुरुस्त विद्युत रोहित्र तातडीने बदलून मिळावे, यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून २०० रोहित्र खरेदीसाठी निधी देण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

गतवर्षीच्या खरीप हंगामातील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. जिल्ह्यातील ६ लाख ८ हजार शेतकऱ्यांना हे अनुदान मिळणार आहे, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातून ७० तलावातील सुमारे ३७ लाख घनमीटर गाळ उपसा करण्यात आला. यामुळे पाणी साठ्यात ३७६ कोटी लिटरची वाढ झाली. हा गाळ ९ हजार ५०० एकरावर पसरण्यात आला आहे. त्यामुळे शेती सुपीक बनण्यास मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

**वयोवृद्ध नागरिकांना सहाय्य साधने खरेदीसाठी मदत; तीर्थ दर्शनही घडविणार**

वाढत्या वयामुळे वृद्धांना अशक्तपणा, दिव्यांगत्वाला सामोरे जावे लागते. यावर उपाययोजना करण्याकरिता ६५ वर्षांवरील अशा नागरिकांना व्हीलचेअर, श्रवणयंत्र यासारखी उपकरणे खरेदी करण्यासाठी मदत केली जाणार आहे. यासाठी शासनाने मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु केली आहे. तसेच ६० वर्षांवरील नागरिकांना मोफत तीर्थक्षेत्र यात्रा घडविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरु केली असल्याची माहिती ना. बनसोडे यांनी दिली.

**अंगणवाडीतील 'वन स्टॉप सेंटर' ठरतेय बालकांसाठी फायदेशीर**

जिल्हा परिषदेने अंगणवाडीमध्ये 'वन स्टॉप सेंटर' सुरु करण्यात आली असून आरोग्य तपासणी, लसीकरण, समुपदेशन, बाळंतविडा वाटप या सारख्या सेवा देण्यात येत आहेत. त्यामुळे बालकांच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे. तसेच १७७ बालकांना असलेल्या दुर्मिळ आजारांचे वेळेत निदान होवून त्यांना संदर्भ सेवा देण्यात आली असल्याचे ना. बनसोडे म्हणाले. तसेच जिल्ह्यातील १३ प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ८ आरोग्य वर्धिनी उपकेंद्रांना राष्ट्रीय गुणवत्तेचे मानांकन मिळाले आहे. आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांना राष्ट्रीय मानांकन मिळालेला लातूर हा राज्यातील एकमेव जिल्हा असल्याचे त्यांनी नमूद केले.

परिवहन विभागामार्फत उदगीर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्यात आले आहे. एमएच ५५ क्रमांक असलेल्या या कार्यालयाद्वारे पाच तालुक्यांतील नागरिकांना सेवा दिली जाणार आहे. उदगीर येथे विविध समाजासाठी भवन, सभागृह उभारण्यात येत आहेत. तसेच उदगीर येथे नगरपालिकेने भव्य बुद्ध विहार उभारले आहे. या बुद्ध विहाराचे लवकरच लोकार्पण होणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील क्रीडा सुविधांच्या बळकटीकरणासाठी प्रयत्न**

जिल्ह्यातील क्रीडा सुविधांच्या बळकटीकरणासाठी १६४ कोटी १३ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यातून लातूर विभागीय क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल आणि ६ तालुका क्रीडा संकुलांचा विकास केला जाणार आहे. तसेच मनरेगा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या १०१ शाळांमध्ये क्रीडांगण विकास करण्यात येत असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

यावर्षी १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत महसूल पंधरवडा अभियानाद्वारे राज्य शासनाच्या योजनांचा प्रसार आणि प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. या उपक्रमामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख बनण्यास मदत झाली असल्याचे ना. बनसोडे म्हणाले. लातूर जिल्ह्यात वन क्षेत्र कमी असल्याने वृक्ष लागवडीसाठी जिल्हा प्रशासनाने 'माझं लातूर, हरित लातूर' अभियान सुरु केले आहे. जून महिन्यापासून या अभियानामध्ये जवळपास ३० लाख वृक्ष लागवड झाली असल्याचे नमूद करून प्रत्येक कुटुंबाने किमान एक तरी झाड लावून लातूर जिल्हा हरित बनविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन ना. बनसोडे यांनी यावेळी केले.

ध्वजारोहणानंतर राखीव पोलीस उपनिरीक्षक डी. डी. माने यांच्या पथकाने मानवंदना दिली. या कार्यक्रमाला उपस्थित स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांचा क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांना विशेष सेवा पदक जाहीर झाल्याबद्दल यावेळी त्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच विविध योजना, उपक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, पुरस्कारप्राप्त खेळाडू, विद्यार्थी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

# लातूर एमआयटी येथे उत्साहात स्वातंत्र्य दिन आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण

लातूर :– भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने माईर्स एमआयटी वैद्यकीय शैक्षणीक संकुल, लातूर येथे गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा विधानपरिषदेचे सदस्य आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मोठ्या उत्साहाच्या आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

विविध क्षेत्रात गेल्या वर्षभरात प्राविण्य मिळवल्याबद्दल कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते महाविद्यालयातील अध्यापक प्रा. डॉ. अभिजीत रायते, प्रा. डॉ सचिन इंगळे, प्रा. डॉ. महेश उन्नी, वैद्यकीय शिक्षण तृतीय वर्षातील विद्यार्थी प्रजय गिरी, देवांग कुलकर्णी त्याचबरोबर पद्युत्तर विद्यार्थी डॉ. गिरिजा नावंदीकर, डॉ. अक्षय पाटणकर, डॉ. प्रियंका मल्होत्रा, डॉ. आकाश शेट्टी, डॉ. अक्षता माने, डॉ. श्रद्धा शिंदे, डॉ. ऋतुजा काळे, डॉ. श्वेता राठोड, डॉ. श्रुती सारडा यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. त्याचबरोबर धन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सभासद कर्मचाऱ्यांच्या ९० टक्केहून अधिक गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत पाल्यांचा विविध पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी नर्सींग महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वानन सेना, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यतीश जोशी, रुग्णालय अधीक्षक डॉ. माले, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. होगाडे, डॉ. अरुणकुमार राव, डॉ. एन. व्ही. कुलकर्णी, डॉ. बबन आडगावकर, डॉ. विद्या कांदे, डॉ. चंद्रकला पाटील, डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. कारंडे, डॉ. पठाण, डॉ. बी. एस. वारद, डॉ शैला बांगड, डॉ. क्रांती केंद्रे, मुख्य प्रशासकीय




अधिकारी सचिन मुंडे, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, फिजीओथेरपी महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक व नागरीक ध्वजारोहन कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फादर सुसाई इंग्लिश स्कूल (कांदिवली) येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा





मुंबई / कांदिवली प्रतिनिधी :–

१५ आगस्ट १९४७ हा आज घडीला आपल्या देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत, दि. महाराष्ट्र एज्युकेशन अन्ड वेल्फेअर ट्रस्ट संचालित 'फादर सुसाई इंग्लिश स्कूल' औद्योगिक वसाहत कांदिवली पश्चिम मुंबई येथे साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभिलाषा फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष श्री बसंत मालवत, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले त्यावेळी संस्थेचे विश्वस्त पुनिथा फादर सुसाई, शोभा, मॅडम, कवी पत्रकार मधुकर गवई शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. आजचा दिवस आपल्यासाठी केवळ आनंदाचा नाही, तर आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाची आठवण देणारा आहे. त्यांच्या पराक्रमामुळे आज आपण स्वतंत्र भारतात स्वाभिमानाने जगतो. चला, त्यांच्या बलिदानाचे स्मरण करून आपण एक सशक्त, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्याचा संकल्प करूया.

# सारसोळे बसडेपो चौक येथे स्वातंत्र्य दिनी अशोक चक्रांकित तिरंगी ध्वजाला मानाची सलामी

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन हा आपल्यासाठी केवळ आनंदाचा नाही तर, आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाची आठवण करून देणारा आहे त्यांच्या पराक्रमामुळे आज आपण स्वातंत्र्य भारतात स्वाभिमानाने जगतो चला तर मग त्यांच्या बलिदानाचे स्मरण करून आपन एक सक्षत आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्याचा संकल्प करूया, आपल्या सर्वांच्या क्रांतिकारी एकजुटीचा विजय आहे आणि म्हणून या दिवशी सर्व जनतेने आनंद उत्सव जल्लोषात साजरा केलाच पाहीजे आसे विचार

माजी सैनिक : सुरेशजी काकडे यांनी शुभेच्छा पर भाषणात मांडले.

नवी मुंबई / के. एच. हनवते :–

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारत देश हा बिटिशांच्या राजवटीतुन मुक्त झाला आणि म्हणून हा दिवस इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. आनेक शुरविर शहीद सैनिकांच्या बलिदानातून व लोकांच्या एकजुटीच्या क्रांतिकारी संघर्षातून आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. हजारो लोकांच्या रक्ताने हि लाल झालेली भारत भुमी आहे आणि म्हणून या दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी आपन १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन विजय उत्सव व



२६ जाणेवारी प्रजासत्ताक दिन हा आपल्या सर्वांसाठी आनंद उत्सव म्हणून संपूर्ण भारतात जल्लोषात साजरा केला जातो. या खास दिवशी आपन सारे भारतीय नागरिक एकमेकांना शुभेच्छा देऊन आनंद व्यक्त करणे व आपल्या प्रियजनांना याबद्दल आठवण करून देणे आणि देशभक्तीचा गुणगौरव करणे हे आपले अध्यकर्तव्य आहे. आणि म्हणून सालाबाद प्रमाणे या ही वर्षी दिनांक : १५ आगस्ट २०२४ रोजी सारसोळे बस डेपो चौक सेक्टर – ६ नेरूळ नवी मुंबई या ठिकाणी गेली १५ वर्षापासुन बहुजन सारे एक होऊ अशोक चक्रांकित तिरंगी ध्वजाला सलामी देऊ..! या ब्रिद वाक्यनुसार कार्यक्रम राबवण्यात येत आसतो यावेळी या कार्यक्रमास माजी सैनिक : सुरेशजी काकडे, माजी पोलीस (पिएसआय): आत्माराम कांबळे, नेरूळ वार्ड संतोष मनोरे, समाजसेवक : दिलीप आमले वंचितचे सुनिल भोले, गौतम चव्हाण, राहुल शिरसाट, अशोक साळवे, बसपा संजय गायकवाड, नेरूळ जयंती उत्सव आर्यदास गंमरे, युनियन कामगार नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : कोंडीबा हिंगोले, प्रभावती हिंगोले, धनश्री हिंगोले, पंचशील सामाजिक संस्था संघटक भिमराव तायडे, प्रकाश रणदिवे, अजय रणदिवे इत्यादी लहान थोरांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली त्याबद्दल या कार्यक्रमाचे आयोजक : कल्याणराव हनवते यांनी सर्व भारतीय नागरिकांना १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या. व सर्व उपस्थितांचे मनपूर्वक जाहीर आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

# मनपा शाळांतील ११०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

लातूर/प्रतिनिधी:–लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील ११०० हून अधिक विद्यार्थ्यांची पालिकेच्या वतीने आरोग्य तपासणी करण्यात आली.यात ९७ विद्यार्थ्यांना काही समस्या असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

मनपाच्या वतीने लातूर शहरात एकूण १६ शाळा चालवल्या जातात.या शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी शिक्षण घेतात.या विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी रहावे या हेतूने मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे आणि उपायुक्त(आरोग्य) डॉ.पंजाब खानसोळे यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य विभागात कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता कदम,डॉ. प्रकाश मुडपे,डॉ. श्यामा जाधव,डॉ. स्वाती मजगे,डॉ. शर्वरी महाजन,डॉ. आकांक्षा वाडेकर,डॉ. सारा सय्यद,डॉ. कविता काबरा आणि विशेष वैद्यकीय तज्ञामार्फत ही आरोग्य तपासणी करण्यात आली.

या तपासणी अंतर्गत विद्यार्थ्यांचे उंची, वजन सोबतच रक्त (हिमोग्लोबिन, अनेमिया), कान, नाक, घसा, डोळे, दात यांच्या विविध वैधकीय तपासणी करण्यात आले. यातील कांही विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक समस्या असल्याचे लक्षात आले. काही विद्यार्थ्यांना कान,नाक व घसा या संदर्भातील आरोग्य समस्या निष्पन्न झाल्या. तर ४६ विद्यार्थ्यांना दंतचिकित्सा गरजेची असल्याचे निदर्शनास आले. तर १६ विद्यार्थ्यांना डोळ्यांचे समस्या असल्याचे स्पष्ट झाले.या सर्व विद्यार्थ्यांना संदर्भिय आरोग्यसेवा देण्यात आली.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या आरोग्य समस्यावर याच वयात उपचार झाले तर भविष्यात व्याधी वाढणार नाहीत व नियमित आरोग्य तपासणी मुळे विद्यार्थी तंदुरुस्त राहतील यासाठी पालिकेने ही तपासणी मोहीम हाती घेतली होती.

# बालकांमधील श्रवणदोष दूर करण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाची ‘साद’–क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते

लातूर :– जिल्ह्यातील शून्य ते सहा वर्षे वयोगटातील श्रवणदोष असलेल्या बालकांचा शोध घेवून, त्यांच्यावर वेळीच आवश्यक उपचार करण्यासाठी जिल्हा प्रशासाने ‘मिशन साद’ हा महत्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. उमंग इन्स्टिट्यूट आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम चमूच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जाणार असून क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते आज (दि. १५) या उपक्रमाला सुरुवात झाली.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर जिल्हाधिकारी संगीता टकले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपजिल्हाधिकारी डॉ. भारत कदम, नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, शरद झाडके, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, जावेद शेख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, उमंग इन्स्टिट्यूट डॉ. प्रशांत उटगे, डॉ. अपर्णा उटगे, किरण उटगे, डॉ. श्रीशैलम तलारी, डॉ. गणेश डोंगरे, डॉ. विरेश मयनाळे, डॉ. प्रतिक केंद्रे, डॉ. वैभव उटगे, डॉ. प्रविण राठोड, डॉ. अर्जून राठोड, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमची टीम, उमंगचे व्यवस्थापक ड. श्रीहरी गोरे, रामेश्वर जाधव यावेळी उपस्थित होते.

एक हजारातील ५ मुलांमध्ये श्रवणदोष आढळून येतो. यावर वेळीच उपचार न झाल्यास या मुलांना कायमस्वरूपी बहिरेपणा येतो. ऐकण्याची क्षमता नसल्याने संभाषण क्षमतेवरही परिणाम होवून या मुलांमध्ये ऐकण्याचे व बोलण्याचे दिव्यांगत्व येते. त्यामुळे जिल्ह्यातील अशा बालकांचा वेळीच शोध घेवून त्यांच्यावर आवश्यक उपचार करणे आणि लातूर जिल्हा श्रवणदोष



मुक्त करण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने ‘मिशन साद’ हा उपक्रम हाती घेतला आहे.

ग्रामीण भागातील पालकांना आपल्या बालकांमधील श्रवणदोषासारखे आजार, दिव्यांगत्व लवकर लक्षात येत नाही. किंवा त्यावर काय उपचार केले जातात, याची माहिती त्यांना नसते. त्यामुळे श्रवणदोषाचे निदान आणि उपचारासही विलंब होवून बालकांमध्ये दिव्यांगत्व निर्माण होण्याची होते. हे टाळण्यासाठी ‘मिशन साद’ अंतर्गत उमंग आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमचे चमू प्रत्येक अंगणवाडीमध्ये जावून शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करणार आहे. या आरोग्य तपासणीमध्ये श्रवणदोष आढळणाऱ्या बालकांवर पुढील उपचार करण्यात येणार आहेत. आवश्यकता असल्यास कॉक्लिअर इम्प्लांट सारख्या शस्त्रक्रिया करून बालकांमधील श्रवणदोष दूर करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. या उपक्रमासाठी कोणताही स्वतंत्र निधी उपलब्ध नसल्याने कॉक्लिअर इम्प्लांट सारख्या खर्चिक शस्त्रक्रियेसाठी सीएसआर निधीतून सहाय्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे डॉ. उटगे यावेळी म्हणाले.

श्रवणदोष असलेल्या बालकांवर शून्य ते सहा वर्षे या वयातच आवश्यक उपचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक गावात आणि प्रत्येक अंगणवाडीमध्ये जावून बालकांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. बालकांमधील श्रवणदोष दूर करून भविष्यात लातूर जिल्हा ‘श्रवणदोष मुक्त’ केला जाणार आहे. त्यामुळे शेकडो मुलांमधील श्रवणाचे आणि बोलण्याबाबतचे दिव्यांगत्व दूर होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी व्यक्त केला.

**‘मिशन साद’साठी सीएसआर अंतर्गत निधी देण्यासाठी प्रयत्न करणार : ना. बनसोडे**

जिल्हा प्रशासनाने सुरु केलेला ‘मिशन साद’ हा उपक्रम लातूर जिल्ह्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. जिल्ह्यातील बालकांच्या आरोग्यासाठी सुरु करण्यात आलेला हा उपक्रम राज्यासाठी मार्गदर्शक ठरेल. या उपक्रमातून जास्तीत जास्त बालकांचा श्रवणदोष दूर होण्यासाठी, त्यांना चांगले उपचार मिळण्यासाठी या उपक्रमाला सीएसआर निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी यावेळी सांगितले. श्रवणदोष दूर करण्यासाठी यापूर्वी शस्त्रक्रिया झालेल्या, तसेच उपचार सुरु असलेल्या बालकांना यावेळी ना. बनसोडे यांच्या हस्ते औषधीचे वितरण करण्यात आले.प्रारंभी बालकांच्या तपासणीसाठी तयार करण्यात आलेल्या फिरत्या तपासणी आणि उपचार केंद्राला क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली. यावेळी त्यांनी फिरत्या तपासणी आणि उपचार केंद्रातील सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली.

# भारतीय नागरिक म्हणून जात धर्म राज्य विसरून मैत्री भावना वाढवा.- सागर तायडे.

भांडुप / प्रतिनिधी :– भारतीय नागरिकांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य फुकट मिळाले आहे. त्यासाठी त्यांना कोणताही संघर्ष करावा लागला नाही. म्हणूनच तो जात,धर्म ,राज्य यात पहिल्या पेक्षा जास्त विभागला आहे. भारत माझ्या देश आहे सर्व भारतीय माझे बांधव आहेत हे शाळा कॉलेज मध्ये दररोज शिकविल्या जाते,म्हटले जाते. पण शाळा,कॉलेजच्या गेटच्या बाहेर गेल्यावर सर्वच विसरतात. त्यामुळेच आज माणसा माणसांत दरी निर्माण झाली आहे. म्हणूनच आम्ही भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू हो असे म्हणू शकत नाही.भारतीय नागरिक म्हणून जात धर्म राज्य विसरून मैत्री भावना वाढवावी असे सागर तायडे पत्रकार साहित्यिक,कामगार नेते यांनी आवाहन केले.

१५ ऑगस्ट ध्वजारोहण व भांडुप तालुक्या मधील तरुण तडपदार वेळो वेळी अन्याय अत्याचारा विरोधात संघर्ष करणारे लढाऊ नेते वंचित बहुजन आघाडीचे ईशान्य मुंबई जिल्हा अध्यक्ष विश्वासभाऊ सरदार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अशोक केदारे चौक (गाढव नाका) मच्छी मार्केट सकाळी १० वाजता ध्वजारोहण वाढदिवसाच्या निमित्ताने केक कापण्यात आला त्यावेळी सागर तायडे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले. यावेळी ईशान्य मुंबई जिल्हा अध्यक्ष विश्वस भाऊ सरदार,आयोजक आणि उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडीचे ईशान्य मुंबई रमेश भाई सांगारे,ज्येष्ट साहित्यिक लक्ष्मण देठे,आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ट नेते भगवान साळवे,मारुती कांबळे,रिपब्लिकन सेनेचे विजय माने,वंचित चे तालुका अध्यक्ष सुभाष मांदळे,वंचित महिला आघाडी अध्यक्ष अनिता कांबळे,यांनी मार्गदर्शन केले. यावेळी योगेश मोठे,चंद्रकांत गायकवाड, प्रवीण आंबोरे, सिरसाठ,गौतम मोरे कवी गायक,सीमा ताई इंगळे महिला अध्यक्ष वॉर्ड क्रमांक ११४,नागेश खैरमोडे अध्यक्ष वॉर्ड क्रमांक ११३,जितेंद्र थाटे,अनिता गायकवाड,यांची सर्व वॉर्ड व तालुका पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मारुती कांबळे यांनी सूत्र संचालन केले तर रमेश भाई सांगारे यांनी आभार मानले.




# बोनसरी गावात स्वातंत्र्य दिनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दि. १५/०८/२०२४ रोजी तुर्भे (एमआयडीसी) मधील बोनसारी गांव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नालंदा बुद्ध विहार संस्था व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने नालंदा बुद्ध विहार येथे स्वतंत्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ९:०० वाजता सामाजिक कार्यकर्ते तथा समाजसेवक संतोषजी मनोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व शेकडो विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून अल्पहार देण्यात आला



सदर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून समाज सेवक आयु. सुभाष बलखंडे उपस्थित होते तर सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते आयु. दिपक गायकवाड याच्या सह खिराजी धापसे, प्रकाश नंद, बंडु आवचरमल, दिनेश सोनावणे, गणेश शिंदे, रेखाताई इंगळे (शाखाध्यक्षा) , मिरा नंद, जयश्री गायकवाड, अनिता शिंदे, पवित्राबाई वाव्हळ, सिमा कांबळे, कमलबाई धुरंधर इत्यादींनी सहकार्य केले. तर शेकडो शालेय विद्यार्थ्यां सह गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# मुरुड येथील १० कोटी ७८ लक्ष रुपये खर्चाच्या विकास कामाचा आ. कराड यांच्या हस्ते शुभारंभ

## विरोध करणाऱ्यांनी लाडकी बहीण योजनेचे श्रेय घेऊ नये - आ. रमेशअप्पा कराड

लातूर :– केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागाच्या माध्यमातून लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथील १० कोटी ७८ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आले. महायुती शासनाने मंजूर केलेल्या निधीचे आणि लाडकी बहीण यासह विविध योजनांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न निष्क्रिय काँग्रेसच्या आमदारानी करू नये असा इशारा या कार्यक्रमात बोलताना आ. कराड यांनी दिला. या लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण मुरुड शहर ढवळून निघाले या विकास कामामुळे ग्रामस्थांतून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.




मुरुड ग्रामपंचायत भाजपाच्या ताब्यात आल्यापासून भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मुरुड शहराच्या विकासाला गती मिळाली. मुरुड ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या घर तेथे झाड या वृक्षारोपण योजनेचा शुभारंभ, २ कोटी ९५ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे लोकार्पण आणि ३ कोटी ९८ लक्ष रुपये खर्चाच्या विकास कामाचे भूमिपूजन आणि ६२ सिंचन विहिरी व १७५ गायगोठा मंजूर असलेल्या शेतकऱ्यांना धनादेशाचे वाटप असे एकुण १० कोटी ७८ लक्ष रुपये खर्चाच्या विकास कामाचे भूमिपूजन आणि लोकार्पण मुरुड शहरातील सर्वच जिल्हा परिषद शाळेला टीव्ही स्क्रीन व संगणक संचाचे वितरण शुक्रवारी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते पार पडले. याप्रसंगी मुरुडच्या सरपंच अमृताताई अमर नाडे, उपसरपंच हनुमंतबापू नागटिळक, संगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, जीपचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, सां. बा. विभागाचे उपअभियंता तांबोळी, भाजपा पंचायत राज व ग्रामविकास सेलच्या प्रदेश सहसंयोजक डॉ. सरोजनी राऊत, भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, संभाजी वायाळ, सुरज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, प्रताप पाटील, लताताई भोसले, श्रुती सवयी, महेश कणसे, अनंत कणसे यांच्यासह अनेकांचे प्रमुख उपस्थिती होती. मुरुड येथील उपजिल्हा रुग्णालय, जल जीवन मिशन अंतर्गत असलेली पाणीपुरवठा योजना, बस स्थानक येथील कामाची पाहणी करून आ. कराड यांनी समाधान व्यक्त केले.

आमदार स्थानिक निधीसह केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेतून श्रीज्ञानेश्वर मंदिर सभामंडप, अंतर्गत सिमेंट रस्ते, सिमेंट नाली बांधकाम, ओपन जिम, पेव्हर ब्लॉक रस्ता, अंगणवाडी बांधकाम, जि प शाळेत सोलार, शिवरस्ता, समाज मंदिर दुरुस्ती आदी कामाचे लोकार्पण त्याचबरोबर दत्त मंदिर सभागृह, कोकणदेवी सभागृह, नरसिंह मंदिर सभागृह, विविध पेवर ब्लॉक रस्ते, शिव रस्ता, समशान भूमी रस्ता, गावांतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, वैदू हनुमान मंदिर सभागृह, भुसार बाजार पत्रा शेड उभारणी यासह विविध कामाचे भूमिपूजन करण्यात आले. सिंचन विहिरी मंजूर झालेल्या ६५ शेतकऱ्यांना प्रत्येकी ४ लाख याप्रमाणे २ कोटी ४८ लक्ष आणि जनावराचा गोठा मंजूर झालेल्या १७५ शेतकऱ्यांना ७७ हजार रुपये याप्रमाणे १ कोटी ३७ लक्ष रुपयांचे वाटप करण्यात आले. मुरुड शहरात ठीक ठिकाणी झालेल्या भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळ्यास सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक ठिकाणी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात त्या त्या भागातील नागरिकांनी आ. कराड यांचे वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत जोरदार स्वागत केले. एकूणच होत असलेल्या विविध विकास कामाच्या शुभारंभ निमित्ताने संपूर्ण मुरुड शहर ढवळून निघाले. मुख्य जाहीर कार्यक्रम छत्रपती शिवाजी चौकात झाला याप्रसंगी सर्व स्तरातील नागरिकांची मोठी गर्दी होती. लाडकी बहीण योजनेचे बँक खात्यात पैसे जमा झाल्याने आ. कराड यांना अनेक महिलांनी राखी बांधून महायुती शासनाचे आभार व्यक्त केले.

मुरुडला पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी पाणीपुरवठा योजना मंजूर करून कार्यान्वित केली. त्याचबरोबर वेळोवेळी पाठपुरावा करून मुरुडच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी २५ कोटीचा निधी मंजूर करून घेतला असून लवकरच रुग्णालयाची सर्व सोयीयुक्त इमारत उभारली जाईल. खऱ्या अर्थाने मुरुडच्या सर्वांगीण विकासाला महायुती शासनाने गती दिली असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, महायुती शासनाने गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून अनेक योजना सुरू केल्या. महिला भगिनी आत्मनिर्भर हव्यात यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही जाहीर केली असता या योजनेला काँग्रेसवाल्यांनी विरोध केला. महिलांना लाभ मिळू नये यासाठी न्यायालयात गेले. मात्र महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याचे कळताच महिलांना मेसेज टाकून या योजनेचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न नोटाच्या विरोधात निवडून आलेल्या निष्क्रिय काँग्रेस आमदाराकडून केला जात आहे. सरकार कोणाचे आहे योजना कोणाची आहे हे सर्वसामान्य जनतेला ज्ञात असून भावाने केलेल्या मदतीला बहीण कधीच विसरत नाही असे बोलून दाखविले.

शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती सांगून सत्तर वर्ष सत्ता उपभोगलेल्या काँग्रेसने कधीच सर्वसामान्यांचा विचार केला नाही, कोणती योजना दिली नाही. मात्र केंद्र आणि राज्य शासनाने सर्व जाती धर्मांना न्याय देण्याची भूमिका घेऊन विविध योजनेचा लाभ दिला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या पाच वर्षात काँग्रेसचे निष्क्रिय आमदार कुठे होते असा प्रश्न उपस्थित करून निवडणूक जवळ आली की जनता आठवते. आपल्या गावचा, परिसराचा, कुटुंबाचा विकास करण्यासाठी महायुती शासन पुन्हा सत्तेवर आले पाहिजे असे बोलून दाखविले.

या जाहीर कार्यक्रमात हनुमंतबापूं नागटिळक, डॉ. सरोजा राऊत, वैभव सापसोड, महेश कणसे यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून आ रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मुरुड शहरात झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैजनाथ हराळे यांनी केले. या कार्यक्रमास भैरवनाथ पिसाळ, सूर्यकांत नाडे, मेघराज अंधारे, अंजलीताई शिंदे, फुलाबाई इटकर, सुरज सूर्यवंशी, पल्लवी घोडके, रवी माकोडे,अशोक सावंत, बालासाहेब कदम, लहू सव्वाशे, बालाजी पठाडे, सुरत सुरवसे, तात्या ईटकर, विशाल कणसे, उषाताई शिंदे दिनेश अंधारे, अभय सोनपेठकर, पंकज गायकवाड, राजाभाऊ नाडे, नागराज बचाटे, श्याम करपे, गणेश स्वामी, अनिल टेळे, दत्ता गोरे, शैलजा सगर, सचिन घोडके, रेखा उबाळे, योगिता काटे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी, कार्यकर्ते, गावातील महिला, पुरुष सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE